I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 377-380 | e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal | OPEN ACCESS | Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोरोना किंवा कोविड १९ या महामारीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

डॉ. सौ. प्रभा चिंचखेडे

सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.
*Corresponding Author: prabhachinchkhede5@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

जगामध्ये कोणत्याही प्रकारची महामारी किंवा संकट येते तेव्हा सर्वसामान्यांवर देखील त्याचे दुष्परिणाम होतात किंवा असेही म्हणता येईल की सर्वसामान्यांवर आणि देशाच्या आर्थिक अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रभाव होत असतो. अशाच प्रकाराची एका महामारीने सध्या संपूर्ण जगभरात थैमान घातलेले आहे. ती म्हणजे कोविड१९ किंवा कोराना होय. या रोगाचा संसर्ग फारच लवकर होतो. त्याचे शरिरावरए मनावर अनेक विपरीत परिणाम होतांना दिसून येतात. या आजाराने देशभरात असे थैमान घातले की, सरकारला काही कठोर पावलेही उचलावी लागलीत. जसे लॉकडाऊन. या लॉकडाऊन चा परिणाम सामान्य जनतेवर तर झालाच पण त्याच बरोबर रोजगारावर देखील झालेला दिसून येतो. ब—याच लोकांना नोकरीला मुकावे लागले तर बरेच लोक बेरोजगार झाले. त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर देखील झालेला दिसून येतो.

**बीजशब्द :** मुलभूत अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, विवादास्पद अधिकार, न्यायालयीन संरक्षण, परमादेश, संघटना, राष्ट्रीय एकात्मता

**प्रस्तावना :**

संपूर्ण जगभरात कोरोना व्हायरसने धुमाकुळ घातलेला आहे. असे साथीचे आजार येतात तेव्हा फक्त शारिरीक आरोग्याची समस्या उरत नाही तर मानसिक समस्याही होते. कारण साथीचे आजार हे जगण्यातील अनिश्चितता वाढवतात. पण साथीचा आजार जेव्हा महामारी असते तेव्हा ही अनिश्चितता कितीतरी पटींनी वाढते. कोरोना व्हायरस या संकटरशी संपूर्ण जग सामना करीत आहे. कोरोना विषाणू झपाटयाने वाढत असल्यामुळे ही सर्व परिस्थिती आवाक्यात आणण्यासाठी सर्व जगभरात लॉकडाऊन सुरु करण्यात आले. कोरोनाच्या या संकटामुळे आपल्या सर्वांचेच आयुष्य अस्थिर झालेले आहे. कोरोना संकटाने सर्वांना ग्रासून टाकले आहे. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्यासाठी व कोरोना साखळी तोडण्यासाठी देशभरात कडक लॉकडाऊन करण्यात आले. कोरोना काळात खुप मोठे बदल आपल्याला पहायला मिळत आहे. आपल्या सरकारने कोरोना विषाणूंचा सामना करण्यासाठी घेतलेल्या लॉकडाऊनच्या निर्णयामुळे बांधकामाचे कार्य, तसेच इतर कार्य जेथे जास्तप्रमाणात लोक कार्य करतात असे सर्व ठिकाण, लग्न कार्य, शाळा इत्यादी बंद ठेवण्यात आले. जगभरात पसरलेले हे कोरोना संकट कधी टळेल हे कोणीही ठामपणे सागू शकणार नाही. कोरोना व्हायरसचा सर्वात मोठा परिणाम हा अर्थव्यवस्थेवर झालेला आहे. कोरोना संकट येण्याच्या आधीचे रोजगाराचे कार्य अगदी वेगळे होते. प्रत्येक व्यक्ती आपल्या क्षमतेप्रमाणे व पात्रतेप्रमाणे कार्य करुन आपला व आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत होते. महामारीच्या येण्याआधीचे चित्र फारच वेगळे होते. शहरात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असतात या आशेने अनेक ग्रामीण लोक शहराकडे वळलेले होते. रोजगार करता करता त्यांनी आपले स्थान शहरातच निश्चित केले होते. परंतु महामारीने मात्र सर्वांना सळोकी पळो करुन टाकले.

जगभरात सध्या कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. या साथीत जगभरात आतापर्यंत २८७३५ किंबहुना त्यापेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले आहेत. या साथीमुळे जगातील बलशाली सत्तादेखील हतल झालेल्या दिसून येतात. अगदी सूक्ष्म स्वरुपातील या विषाणूमुळे परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समूहाला जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. साथीच्या प्रकारातील या विषाणूचा प्रादूर्भाव जगभरातील अनेक श्रीमंतांपासून ते गरीबापर्यंत होतोय. जोपर्यंत या विषाणूचे स्वरुप, त्याचा प्रसार आणि व्याप्ती याचा ताळेबंद घालायच्या आतच या विषाणूने व्यस्तप्रमाणात पसरायला सुरुवात केलेली आहे. भारतात देखील आजच्या घडीला लाखोंच्या संख्येत केसेस निदर्शनास आल्या आहेत, तर हजारोंच्या संख्येत मृत्यूची नोंद झालेली आहे. असा हा आजार झपाटयाने पसरत आहे.

जगभरात थैमान घातलेल्या या आजारामुळे सर्व जगातील सरकारने काही कठोर पावलेही या काळात

उचललेली दिसून येतात. त्यामध्ये मुख्यत्वेकरुन सामुहीक कार्यक्रमांवर बंदी, कमी लोकांमध्ये लग्नकार्य, शाळा बंद, स्ट्रिट फुड बंद, हॉटेल्स बंद, फक्त पार्सल सुविधा सुरु ठेवण्यात आलेली होती, पार्लर व सलून देखील बंद ठेवण्यात आले होते तसेच खाजगी शिकवणी वर्ग यावर देखील बंदी घातलेली होती. त्यामुळे सर्वांच्या रोजगारावर मर्यादा आलेल्या होत्या. त्यामुळे ब—याच लोकांवर रोजगाराचे संकट निर्माण झालेले दिसून येत होते. शहरात आपल्या गावापासून दूर रहात असलेल्या लोकांना असे वाटत होते की, नाहीतरी शहरात आता रोजगार नाही तर निदान आपण आपल्या गावी जावून आपल्या लोकांमध्ये राहून काही तरी कार्य करु शकु या आशेने बरेच लोक जे काही वर्षापासून आपल्या गावापासून दूर शहरांत राहून आपला उदरनिर्वाह करीत होते ते परत गावाकडे वळतांना दिसून आले. अशाप्रकारे या महामारीने सर्वसामान्यांचे जीवन संपूर्णपणे उध्वस्त केले होते.

शेतकरी, शेतमजूर आणि अनौपचारीक क्षेत्रातील कामगारांना कोविड१९ आणि परिणामी लॉकडाऊनचा सर्वात जास्त फटका बसला आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या दरम्यान राष्ट्रव्यापी लॉकडाऊन भारत सरकारने जाहिर केला होता. त्याचा प्रभाव सर्वत्र रोजगारावर दिसून आला. दुस—या लाटेच्या दरम्यान कठोर निर्बंध नव्हते तसेच लॉकडाऊन स्थानिक स्तरावर होते. दुस—या लाटेला महाराष्ट्रातुनच सुरुवात झाली आणि नंतर दक्षिण भारत व उत्तर भारतात या लाटेचा प्रभाव दिसून आला. कोरोनाच्या पहिल्या लाटेचा सर्वात जास्त प्रभाव हा शहरी अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो, असे नॅशनल सांखिकीय कार्यालयाने नमुद केले आहे. या कालखंडात जे काही अध्ययन करण्यात आले त्यानुसार असे लक्षात आले की, कोरोनाच्या या महामारीचा श्रमिक लोकांवर विपरीत परिणाम झालेला आहे त्यातही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांवर अधिक परिणाम झालेला दिसून येतो. कारण ज्या रोजमजूरी करणा—या स्त्रिया आहेत त्यांचे रोजगार बंद झाले, तसेच घरकाम करणा—या स्त्रिया यांनाही कामापासून मुकावे लागले. याचा परिणाम म्हणजे मानवी स्वास्थ्य बिघडत गेले. कारण कामाचा मानवी स्वास्थ्यावर सरळ परिणाम होत असतो व स्वास्थ्याचा आर्थिक विकासावर प्रभाव पडतो याचे मुख्यत्वे करुन कारण असे लक्षात येते की, जर मानवी चांगले असेल तर कामाचा दर्जाही योग्य असतो व उत्पादनात देखिल वाढ होतांना दिसून येते असे आर्थिक साहित्यात नोंद दिसून येते.

पहिल्या कोरोना लाटेच्या तुलनेत दुस—या लाटेमध्ये ग्रामिण भागात जास्त प्रमाणात संक्रमण पसरलेले दिसून येते व यालाटेने सर्व जनजीवन विस्कळीत झाले. शहरांच्या तुलनेत ग्रामीण महिलांना जास्त प्रमाणात विविध आव्हानांना सामोरे जावे लागले. याहीपेक्षा अधिक बिकट परिस्थिती दुस—या लाटेमुळे निर्माण झाली ती म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सर्वात जास्त प्रमाणात परिणाम झालेला दिसून येतो. शहरांतील व महानगरातील बरेच मजूरवर्ग आपापल्या गावाला परत जायला लागले. त्यांनी आपल्याच गावाला राहून रोजगार करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ग्रामीण भागात जनजीवनावर खुप परिणाम झाला तो म्हणजे ग्रामीण भागात बेरोजगारी वाढली, जी काही बचत होती ती संपायला आली.प्रत्येक कुटुंबाची परिस्थिती बिकट होत गेली.

गावातील बरेच कुटुंब हे आपल्या कुटुंबियांच्या जे शहरात राहून कामकाज करतात त्यांच्याद्वारे पाठविल्या जाणा—या रक्कमेवर अवलंबून होते. अशा परिस्थितीत मिळकत कमी आणि कौटुंबिक सदस्य संख्या वाढली यामुळे कुटुंबियांचे अंदाजपत्रक पूर्णपणे बिघडले. जुन ते ऑगस्ट २०२० च्या दरम्यान केल्या गेलेल्या सर्वेक्षणाद्वारे असे दिसून येते की, आपल्या गावी परत जाणा—या मजूरांचे उत्पन्न हे ८५ टक्के कमी झाले. त्यामुळे जवळील बचत देखील कमी झाली आणि कुटुंबियांना आपले सद्यस्थितीत असलेले कर्ज चुकविणेदेखील कठीन झाले, इतकेच नव्हे तर आपल्या गरजा पूर्ण करण्याकरीता त्यांना दुस—यांसमोर हात पसरावे लागले. यामहामारीने ब—याच घरातील कर्ते पुरुष मृत्यूमुखी पडल्यामुळे कितीतरी स्त्रिया विधवा व बालके अनाथ झालीत. त्यामुळे घरातींल महिलांवर त्याचा बोझा वाढत गेला. आणखी एक विदरक चित्र या महामारीने दाखविले ते म्हणजे वाढता हिंसाचार, सायबर गुन्हे या सारख्या समस्यांनी या महामारीच्या आगीत तेल टाकण्याचे काम केले. विश्व बॅंकेच्या एका अहवालानुसार भारतात एक करोड २० लाखाहून अधिक व्यक्ती आर्थिक परिस्थितीच्या उत्पन्न रेषेच्या खाली गेलेल्या दिसून येतात. तसेच राष्ट्रीय महिला आयोगाद्वारे केलेल्या अहवालामध्ये देखील या महामारीचे परिणाम दिसून आले ते म्हणजे यौन हिंसा, ऑन लाईन पिडीत महिला तसेच घरातील व्यक्तिंचे दुर्वव्यहार इत्यादी. २०१९ च्या अहवालानुसार २९६० घरगुती हिंसा होत होत्या तो आकडा २०२० मध्ये ५२९७ झालेला दिसून येतो. २०२१ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगासमोर महिलांवर होणा—या अत्याचारांचे २००० केसेस आलेल्या आहेत यामधील जवळजवळ एक चतुर्थांश केसेस या घरगुती हिंसेच्या आहेत. वास्तविक पहाता हे आकडे खरी परिस्थिती पूर्णपणे सांगत नाहीत

कारण अनेक महिला अपराधाच्या विरोधात आवाज उठविण्यापेक्षा चुप राहणे कबूल करतात.

द लान्सेट यांच्या एका लेखाद्वारे असे लक्षात येते की, या महामारीमध्ये मातृ मृत्युदर वाढलेला आहे. लिंक्डइन वर्कफोर्स कॉन्फिडेंस इंडेक्स द्वारे असे लक्षात येते की, महिला रोजगारांकरीता व्यक्तिगत विश्वास सूचकांक (आईसीआई) मार्च २०२१ मध्ये ५७अधिक होता जो जून २०२१ च्या सुरुवातील कमी होवून ४९अधिक झालेला आहे. याचकालखंडात पुरुषांच्या आईसीआई सूचकांकानुसार मार्चमध्ये ५८अधिक होता तो कमी होवून ५६अधिक झालेला आहे. यावरुन असे लक्षात येते की, कामकरी महिलांना त्यांचे खाजगी जीवनात अतिरिक्त जबाबदा—या उचलाव्या लागल्यात त्यामुळे त्यांचे स्वत:ची प्रगती मात्र खुटल्या गेली. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकोनॉमी (सीएमआईई) नुसार हे ज्ञात होते की, जानेवारी ते एप्रिल २०२१ च्या दरम्यान पदवीधर व त्यापेक्षा जास्त शिक्षीत महिलांमध्ये १९.३ टक्के महिला या बेरोजगार होत्या व ज्या नोकरीच्या शोधात आहेत.

कोरोना व्हायरसने संपूर्ण जगामध्ये धुमाकुळ घातला आहे हे आपण पहातोच आहोत. लाखो लोक मृत्युमुखी पडत आहे काही देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी करुन टाकणारी ही प्रचंड मोठी महामारी भारतात मात्र कमी वेगाने पसरत असली तरी भारत सरकारने व राज्यसरकारने वेळीच उचललेली हयाचा परिणाम होय. सरकारचे सकारात्मक धोरणे यामुळे महामारी काही प्रमाणात नियंत्रणातही येत आहे असे दिसून येते. विकसित देशांची कोसळणारी अर्थव्यवस्था आपल्या भारतासारख्या विकसनशिल देशाच्य या अर्थव्यवस्थेवर आलेला अतिरिक्त भार आणि त्याचबरोबर अविकसित देशांमध्ये हळूहळू शिरकाव करणारा कोरोना व्हायरस ही सध्याची परिस्थिती आहे. आज रब्बीचे पीक शेतात उभे आहे. मात्र काढणीला मजूरच मिळत नव्हते, त्यातच टाळेबंदीमुळे बाजारपेठाही बंद त्यामुळे एकंदरीत कोरोनामुळे शेती व्यवसाय संकटात सापडला होता. देशात लागू झालेल्या टाळेबंदीचा ग्रामीण भारतातील अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला. ग्रामीण भागात ज्यांचे पोट हातावर आहे, अशा लोकांच्या हालअपेष्टांना तर पारावार उरलेला नाही. देशात सर्वाधिक रोजगार शेतीक्षेत्राशी निगडीत आहेत. देशातील ८५ टक्के शेतक—यांकडे अडीच हेक्टरपेक्षाही कमी जमीन आहे. हीच जमीन ते कसतात त्यावर पीक घेतात आणि त्यावर कुटुंबाचे पालनपोषन करतात. ९० लाखाहून जास्त मच्छिमारांचा उदरनिर्वाह थेट मासेमारीवर अवलंबून आहे. त्यातील ८०टक्के मच्छिमारांचे उत्पन्न जेमतेम आहे, मच्छिमारी क्षेत्र एक कोटी चाळीस लाख लोकांना रोजगार पुरवते. हातातोंडाशी आलेले रब्बी पीक सध्या शेतात तसेच उभे आहे टाळेबंदीमुळे सर्व व्यवहारच ठप्प झाले आहेत. खरे तर काळीमिरी, कॉफी, केळी या पिकांच्या लागवडीचा तो हंगाम होता पण तोही वाया जाताना दिसत होता कारण पीक काढणीत उपयोगाला येणारी हार्वेस्टर्स, थ्रेशर्स, ट्रॅक्टर्स यांसारखी यंत्रे मिळेनाशी झाली आहेत. मालवाहतुक ठप्प झाली, लोकांच्या हालचालीवर बंदी आली त्यामुळे फळे, भाजीपाला आणि फुले यांसारख्या नाशवंत पिकांचे उत्पादक तर तोटयात गेले त्यांचया मालाला उठाव नाही हाती असलेला माल त्यांना कवडीमोल भावाने विकावा लागत होता. या परिस्थितीचा फायदा दलाल लोकांनी घेतला. तामिळनाडूतील अनेक लहानसहान शेतकरी नगदी पीक म्हणून फुलांचे उत्पादन घेतात मात्र या कोरोना काळात त्यांनाही नुकसान सहन करावे लागले ते म्हणजे जर कोरोनाविरहीत परिस्थिती असती तर याच शेत—यांनी फुलांच्या शेतीतून लाखोंनी उत्पन्न घेतले असते, वाहतुकीच्या अभावामुळे शेतावर मजुरी करुन उदरनिर्वाह करणा—या कामगारांनाही हातावर हात टाकुन बसावे लागले. त्याचकाळात कोंबडयांवरदेखील एक रोग संक्रमित झाला होता त्यामुळे पोल्ट्रीफार्मच्या व्यवसायावरही सकंट उभे झाले होते.

अशा या सर्वत्र टाळेबंदीच्या काळात सर्वांवर संकट उभे झाले होते, त्यातुन आदिवासी देखील सुटले नाही. वनोत्पादनांबरोबरच तेंदु पाने गोळा करणे आणि मोहाची फुले गोळा करणे हे दोन मुख्य व्यवसाय आदिवासी लोक करतांत त्यातुन त्यांना ब—यापैकी उत्पन्न मिळत होते मात्र या टाळेबंदीमुळे यावरही निर्बंध आल्यामुळे कोणताही एजंट त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हते व स्थानिक बाजारपेठाही बंद होत्या. अशा सर्व परिस्थितीचा सर्वसामान्य व्यवस्थेवर बराच परिणाम झाला. लोकांना काम मिळेना मग अशावेळी जे काम करणे शक्य असेल ते करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करीत होती. त्यामुळे वैयक्तीक अर्थव्यवस्थेवर परिणाम तर झालाच परंतु नकळत त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला आहे.

कोरोना महामारी आणि त्यावर आळा घालण्याकरीता केलेली संचारबंदी व त्यामुळे निर्माण झालेली दुरावस्था या सर्वांचा विचार केला असता असे लक्षात येते की, महामारीला आळा घालण्याकरीता सरकारने जो तातडीचा निर्णय घेतला संचारबंदीचा त्यामुळे सामान्य जनजीवन खुप प्रभावीत झाले. स्ट्रीट व्हेंडर, मजूर, बाजारपेठेत दररोज भाजीपाला विकणारे, यासर्वांना त्याची झळ पोहचलेली आहे. त्याचा परिणाम त्याच्या वैयक्तिक आर्थिक

व्यवस्थेवर तर झालाच आहे पर्यायाने राज्याच्या व देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर फार मोठे सकंट आले कारण या कालावधीत बाजारपेठ बंद, घरकाम करणारे लोकांना कुणीही घरी येवू देत नव्हते, तसेच उत्पादीत माल विकल्या जात नव्हता, कारखाने बंद त्यामुळे त्यावर अवलंबून असणारे मजूर कुली या सर्वांना त्याचा फटका बसलेला आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करता असे लक्षात येते की, ही परिस्थिती निवळायला वेळ लागणार आहे. अशावेळी सरकारकडून बरेच प्रयत्न सुरु आहेत या महामारीवर शोधून काढलेली कोरोना लस ही कामगीरी प्रशंसनीय आहे. त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था यांनीही या काळात बरेच प्रयत्न केले व जनतेला एक मानसिक आधार दिलेला होता. अशी ही निर्माण झालेली परिस्थिती दूर करण्यासाठी आपल्याला स्वत: काही प्रयत्न करावे लागतील व सरकार देखील प्रयत्नात आहे. कारण या महामारीने सर्वांना पांगळे केलेले आहे त्यातुन आपल्याला मुक्त व्हायचे आहे. या महामारीने ब—याच कुटुंबातील कर्ता व्यक्ती निघून गेल्यामुळेदेखील कुटुंबावर आर्थिक संकट उभे झाले आहे. अशी ही जीवनाची विस्कळलेली घडी व्यवस्थित करण्याकरीता आपणासर्वांना एकमेकांचे सहाय्य निश्चितच करावे लागेल. सरकारी यंत्रणांना सहकार्य करावे लागेल तरच आपण या महामारीमुळे विस्कळलेल्या आर्थिक घडीला पूर्ववत करता येईल. याकरीता एका दहासुत्रीय कार्यक्रमाच्या माध्यमातून या महामारीवर नियंत्रण करता येईल व अर्थव्यवस्था पुर्नजीवीत करण्यास मदत होईल. यादृष्टीने केंद्रसरकारने मे २०२१ मध्ये कोरोना महामारी प्रतिबंध या हेतूने एसओपी म्हणजे स्टैंडर्ड ऑपरेटींग प्रोसीजर या एका मानकाची यादी जाहीर केली ज्यात शहरी, ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्राकरीता समान राहील. यामध्ये पंजीकृत व मान्यता प्राप्त आशा कर्मचारी यांनी कोविड बाबत प्रशिक्षण देणे. बचत गटाच्या माध्यमातून महीलांना या महामारीच्या प्रोटोकॉलनुसार जागृकता निर्माण करणे. मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे. मृत्यूदर नियंत्रणात आणता येईल याबाबत प्रयत्न करणे. लसीकरणाबाबत प्रोत्साहन देणे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार या अंतर्गत रोजगार देणे व स्वास्थसुविधा निर्माण करणे इ. चा समावेश होतो.

**शिफारशी :—**

१. टास्क फोर्सचे संगठन करणे ज्यात स्वास्थ्य मंत्रालय ग्रामीण विकास मंत्रालयत्र कृषी मंत्रालय, पंचायती राज, राज्यसरकार, इ. सर्वांचा समावेश राहील.
२. कोरोना बाबत जागृकता निर्माण करणे.
३. ग्रामीण भागात स्वच्छतेच्या बाबतीत व स्वास्थ्याच्या दृष्टीने परिपक्व पाऊल उचलावे.
४. ग्रामीण क्षेत्राला विशेष आर्थिक सहाय्य देणे.
५. लसीकरणाबाबत जागृकता.
६. गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने कडक निर्बंध घालणे.
७. आवश्यक औषधोपचार व उपकरणांचे वितरण करणे.

**संदर्भ :**

ग्रामीण भारतमें कोविड १९ की महामारीपर कैसे जीत हासील हो:योजना व कार्यवाही. एम. चक्रवर्ती व श्शोबा सुरी.

कोरोना व ग्रामीण अर्थव्यवस्था : आर. व्ही. भवानी.

नॅशनल स्टैटिस्टिकल ऑफीस चा अहवाल.

ग्रामीण भारत के लिए बाढ से भी ज्यादा नुकसानदायक थी कोविड१९ की दुसरी लहर. : रिचर्ड महापत्र व शगुण कपील.